लोकमत

# फिनोलेक्स इंडस्ट्रीजचा संकटकालात मदतीचा हात

## मुकुल माधव फाउंडेशन : कोरोना व चक्रीवादळ पीडितांना मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना महामारी, निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा यामुळे देशाच्या विविध भागांचे, तसेच तेथील नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) संपूर्ण भारतभर मदतीचा हात दिला आहे. विविध स्तरांतील वंचित घटकांना, तसेच कोरोनायोद्ध्यांना पाठबळ देण्याचे काम फाउंडेशनने केले. 'एमएमएफ'चा २६ वा वर्धापनदिवस (दि. २६ जुलै) नुकताच झाला. या निमित्ताने व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती दिली. फाउंडेशनशी जोडल्या गेलेल्या सहकाऱ्यांकडून, कॉर्पोरेट दात्यांकडून, स्वयंसेवक व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यामुळे या संकटांचा सामना करणे शक्य झाल्याचे त्या म्हणाल्या.



रोजंदारीवरील, स्थलांतरित मजूर, प्लम्बर आदी घटकांना ग्रोसरी किट, जीवनाश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. अनामित्र आणि विकास खन्नाज फीड इंडिया यांच्या सहकार्याने एक लाखापेक्षा जास्त लोकांना अन्नधान्य दिले. तसेच पुण्यातून बाहेरगावी जाणाऱ्या १३ हजार स्थलांतरित मजुरांना चप्पल, खाद्य दिले. राजस्थानातील संगीत कलाकार, पुण्यातील तृतीयपंथी समाजाला रेशन देण्यात आले. कापडी मास्कच्या माध्यमातून एचआयव्हीग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून दिला. देशभरातील विविध समुदायांना त्याची मदत झाली आहे.

\- रितू प्रकाश छाब्रिया